महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

वर्ष-१० अंक-४

जून - जुलै २०१६

माझ्या कर्मचारी बंधू आणि भगीनींनो,

स्वातंत्र्यदिनाच्या सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा. देशाच्या प्रगतीत विद्युत क्षेत्र फार महत्वाचा घटक आहे. त्याकरीता विजेची पुढील वर्षांकरीता मागणी तसेच दुर्गम भागात वीज पुरवठा हे ध्येय गाठण्याकरीता अनेक संस्था, देशात ह्या क्षेत्राच्या नियोजनात कार्यरत असतात.

देशाच्या कानाकोपऱ्यात अविरत, अखंड आणि किफायती दरात विजेचा पुरवठा करणे व त्याकरीता संपुर्ण नियोजन करून त्यामध्ये असलेल्या सर्व संस्था यांच्याबरोबर समन्वयाने वीज यंत्रणेची संचलन व सुव्यवस्था तसेच ठरवुन दिलेले प्रकल्प कार्यान्वित करणे गरजेचे राहते.

जसे पाणी जीवन आहे तसे आज वीज सुध्दा आधुनिक जीवनाचा अविभाज्य घटक आहे. विजेचे रुपांतर आज ऊर्जेमध्ये झालेले आहे आणि ऊर्जेशिवाय जीवन ठप्प होऊन जाते याची प्रचिती आपल्याला आलेली आहे. सर्वांना वीज मिळवुन देणे हे सरकारचे धोरण आहे व त्याचा पुरवठा अविरत करणे हे आपल्या सारख्या वीज क्षेत्रातील संस्थेच्या अस्तित्वाचे कारण आहे. आज आपले यंत्रचालक, कारागीर, अभियंते देशाच्या कानाकोपऱ्यात कार्यरत आहेत व अखंड वीज पुरवठा राखण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

संपुर्ण देशाचे नियोजन हे राज्याच्या कामगिरीवर विसंबुन असते. त्यामुळे प्रत्येक राज्याने त्यांना ठरवुन दिलेले प्रकल्प वेळेत पुर्ण करणे महत्वाचे असते. आज महाराष्ट्रात राज्याची कामगिरी समाधानकारक आहे. राज्य जरी विस्तृत असले तरी अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प तिनही क्षेत्रामध्ये जसे की निर्मिती, पारेषण व वितरण राबविण्यात आपल्याला यश आले. आज त्यामुळे महाराष्ट्र भारनियमनापासून मुक्ती मिळविण्याच्या मार्गावर आहे व अशीच चांगली कामगिरी आपल्याकडून झाली तर आपण विजेच्या अधिसंख्य प्रवर्गात जाऊन बसु शकतो. तरीही आपल्याला समाधानी होऊन चालणार नाही व अधिक प्रयत्नशील होऊन आपले स्वप्न वेळे अगोदर साकार होण्यास सहकार्य करायला पाहिजे.

महत्वाकांक्षी टप्पे गाठताना यंत्रणेच्या मजबुती, संचलन व सुव्यवस्था तसेच अपघात शुन्य कार्यक्षेत्र हे घटक सुध्दा तितकेच महत्वाचे असतात. जोखीम न घेता निर्देशीत केलेल्या कार्यप्रणालीनुसार काम करणे गरजेचे असते. त्यास दुर्लक्ष केल्यास अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आज वीजक्षेत्रात अपघात घडताना आढळतात त्याला आवर घालणे महत्वाचे आहे.

आज अभियांत्रिकी तसेच व्यवस्थापकीय अनेक बदल होणार आहेत. संपुर्ण क्षेत्र पुर्णरचीत होण्याच्या मार्गावर आहे. त्याकरीता एक कुशल अभियंता व अधिकारी होणे महत्वाचे आहे. त्याकरीता आपल्याला आपल्या क्षेत्राच्या निगडीत सर्व विषयांची माहिती असणे गरजेचे आहे. Construction, Testing, O&M, SLDC, STU या प्रत्येक विषयाचे ज्ञान अभियंत्यास असणे गरजेचे राहते व त्यामुळे त्याच्यामध्ये कुशलता येते. ही कुशलता आपल्या अभियंत्यांमध्ये यावी ह्याकरीता मानव संसाधन विभाग वेगवेगळ्या योजना राबवत आहेत व धोरण आखत आहे.

अंतर्गत सुधारणा हा आपल्या विकासाचा मुलमंत्र आहे. आपण ज्या कक्षेमध्ये काम करतो त्या कक्षेच्या संपुर्ण System, Process and Procedure चे ज्ञान आपल्याला मिळत असते. त्यामुळे त्यामध्ये कोणती सुधारणा करावी की जेणेकरून त्याचे Value Creation अधिक वाढेल ह्याच फलस्वरूप Internal Improvement च्या माध्यमातून मिळते. करीता हा मुलमंत्र सर्वांनी अंगीकृत करणे गरजेचे आहे त्यामुळे आपण सतत आपल्या Processes मध्ये काळानुरूप बदल घडवून आणुन त्याचे फायदे संस्थेला मिळवुन देऊ शकतो.

आज SAP, ERP सारखे तंत्रज्ञान आपल्या कंपनीमध्ये कार्यान्वित आहे. आपण सर्वांनी त्याची माहिती घेऊन त्याचा चांगला उपयोग करून घेतला पाहिजे. एक स्वच्छ, सुंदर, पारदर्शक, न्यायिक संस्था आपल्याला घडवायची आहे. आपण सर्वांनी त्याकरीता सहकार्य केले पाहिजे. एक आदर्श संस्था म्हणून आपण आपल्या संस्थेला नावारूपाला आणायचे आहे.

आज अनेक नवीन उपक्रम आपण राबवित आहोत. नुकताच Vendor Meet कार्यक्रम घेवुन आपण आपल्या Partners बरोबर वेगवेगळ्या विषयावर Interaction केले. त्यातुन एक नविन चेतना तसेच ऊर्जा जागृत झाली. अश्या प्रकारे आपल्याबरोबर कार्यरत असलेल्या सर्वांना बरोबर घेवुन त्यांना आपल्या Value Chain मध्ये चांगली कामगिरी करण्याकरीता प्रोत्साहित करायचे आहे. करीता आपण स्वत: प्रथम आदर्श असणे गरजेचे आहे तरच लोकांवर आदर्शवाद आपण बिंबवु शकतो.

स्वातंत्र्याची ७० वर्षे पुर्ण झालेली आहेत. आपल्याला आता मोठी कामगिरी गाठायची आहे हे आपल्या सर्वांना माहिती आहे. स्पर्धात्मक युगात आपले महत्व टिकवुन ठेवायचे आहे. देशाच्या विकासात मोलाचा हातभार लावायचा आहे. चला पुन्हा एकदा देशाच्या 'Power To All' ध्यैयाकरीता कटीबध्द होऊया.

शुभेच्छां सह!

**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

PDF processed with CutePDF evaluation edition www.CutePDF.com

# महापारेषण वाशी परिमंडळातंर्गत वृक्षारोपण









महाराष्ट्र शासनाच्या कृती कार्यक्रमानुसार कळवा संकुल, ऐरोली येथे दि. १ जुलै २०१६ रोजी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. सदर कार्यक्रमाला महापारेषण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, मा.श्री. राजीव कुमार मित्तल हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. तसेच इतर मान्यवरांमध्ये कार्यकारी संचालक (मा.सं.), श्री. सूरज वाघमारे व श्री. संजय शिंदे, मुख्य अभियंता, वाशी परिमंडळ, श्री. अशोक लाडे, मुख्य अभियंता (संवसू), सांघिक कार्यालय, मुंबई, डॉ. संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, राज्य भार प्रेषण केंद्र त्याचप्रमाणे कळवा संकुलातील अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते. या कार्यक्रमात महापारेषण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, मा. श्री. राजीव कुमार मित्तल यांच्या हस्ते तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करुन वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरवात झाली. एकूण कळवा सर्कलमध्ये १७० वृक्षाची लागवड करण्यात आली. वाशी परिमंडळामध्ये एकूण १४९० वृक्षलागवडीचे उद्दिष्ट असतांना ही अधिकारी व कर्मचारी यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद पाहता वाशी परिमंडळातंर्गत एकूण २१२० वृक्षाची लागवड करण्यात आली.

या प्रसंगी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी उपस्थीतांना मार्गदर्शन करताना कुठलीही गोष्ट घेणे किंवा करणे हे फार सोपे असते पण ती सांभाळणे कठीण असते. आजही आपण सर्वांनी वृक्षलागवडीतून निसर्ग किंवा पर्यायाने पर्यावरण जपण्यासाठी वृक्षारोपण केले खरे पण त्यांची काळजी घेणे मात्र महत्वाचे आहे. वृक्षारोपण करून काम संपत नाही तर ते वाढवणे व वृक्षांची काळजी घेऊन सतत वृक्षा रोपण करत राहणे हा त्या मागचा उद्देश होय.

## महाऊर्जा तर्फे २२० के. व्ही उपकेंद्र वाशाळा सन्मानित

वीज बचतीसाठी दरवर्षी महाऊर्जा ही संस्था स्पर्धा घेत असते. या स्पर्धेत महापारेषण तर्फे वाशी परिमंडळातील २२० के. व्ही वाशाळा उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांनी महाऊर्जाच्या “एनर्जी कान्झर्वेशन” या स्पर्धेत सहभाग घेतला होता. अनुक्रमे २०१२-१३ व २०१३-१४ या काळात उपकेंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांनी आपआपल्या स्तरावर विविध तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उपकेंद्रातील वीज संसाधनाच्या योग्य वापरासाठी व साधनांच्या सुरक्षा व तापमान नियमनासाठी होणारा वीज खर्च कमी करून महापारेषण कंपनीच्या उपकेंद्र खर्चात बचत केली. बचतीसाठी वेगवेगळे प्रयोग करून महापारेषण कंपनीचा फायदा व कर्मचाऱ्यांत वीज बचतीचे महत्व व त्याबद्दलची जाणीव निर्माण केली. या सगळ्यांचा महाऊर्जाचे “एनर्जी कान्झर्वेशन” चे स्पर्धेत सहभाग घेतला या स्पर्धेत महापारेषण कंपनीच्या वाशाळा या उपकेंद्राची निवड सदर पुरस्कारासाठी नामनिर्देशित करण्यात आली होती. महाराष्ट्र शासनाच्या उर्जा विकास अभिकरण संस्थेच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय पुरस्कार २२० के. व्ही वाशाळा व २२० केव्ही जांभुळकर या उपकेंद्रांना मिळाला. पुरस्कारांचे वितरण मा. ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावणकुळे यांचे हस्ते पुणे येथे प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आले. या कार्यक्रमात महापारेषण कंपनीतील एकमेव वाशाळा उपकेंद्र असल्याने अधिकाधिक मंडळ, विभागीय कार्यालये यांनी सहभाग नोंदवावा अशी आशा ऊर्जामंत्र्यानी केली. या कार्यक्रमाला नामवंत शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर उपस्थित होते.



दोन्ही केंद्रात सन २०१२-१३, २०१३-१४ चे काळात विविध उपाययोजना करून विजेच्या वापरात खुप बचत केली. श्री. श्रीकांत पेटकर, अति कार्यकारी अभियंता, २२०केव्ही वाशाळा उपकेंद्र व श्री. मनोहर बागले, अति कार्यकारी अभियंता, २२० केव्ही जांभुळकर या उपकेंद्र यांचे वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता, श्री. एस.टी. शिंदे यांनी ही कौतुक केले. इतर उपकेंद्रानीही असाच उपक्रम राबवावा व कंपनीला फायदा करावा असे सांगितले.

## प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, तळंदगे, येथे प्रस्तावित नवीन इमारतीचे व व्यायामशाळेचे भूमीपूजन

कराड परिमंळांतर्गत प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, तळंदगे, (कोल्हापूर) येथे दि. 16.07.2016 रोजी प्रस्तावित नवीन इमारतीचे व व्यायामशाळेचे भूमीपूजन करण्यात आले. त्याचप्रमाणे वृक्षारोपणाचा कार्यक्रमही पार पडला. याप्रसंगी मुख्य अभियंता, श्री. अशोक लाडे (PAC), सांघिक कार्यालय, मुंबई, मुख्य अभियंता, श्री. यशवंत गजाभिये, कराड परिमंडळ, महाव्यवस्थापक, श्री. सुधीर वानखेडे (मासं-तां.), सांघिक कार्यालय, मुंबई, अधीक्षक अभियंता, श्री. शशीकांत बाकरे, (प्रशिक्षण विभाग), सांघिक कार्यालय, मुंबई, श्री. महेंद्र वाळके, (HVDC) पडघे, श्री. सतीश अणे, (HVDC) चंद्रपूर, श्री जयंत कुलकर्णी (TCC), पुणे, श्री. रंगनाथ चव्हाण (TCC), कराड, कार्यकारी अभियंते, श्रीमती वर्षा शिंदे (प्रशिक्षण विभाग), सांघिक कार्यालय, मुंबई, श्री. महेश पाठक (प्रा.प्र.कें. बाभळेश्वर), श्री. मिलिंद देवळे (PAC), सांघिक कार्यालय, मुंबई, व सर्व प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रांचे समन्वयक अधिकारी यांची उपस्थिती होती. तसेच, महापारेषणच्या सर्व प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रांची आढावा बैठक ही आयोजित करण्यात आली होती. यामध्ये, महापारेषणची सर्व प्रा.प्र.केंद्रे आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर करण्याच्या दृष्टीने व्यापक विचार विनिमय करण्यात आला. सर्व प्रा.प्र.कें. प्रभारींनी व समन्वयकांनी चर्चेमध्ये सक्रीय सहभाग घेऊन सकारात्मक प्रतिसाद दिला.



या सर्व कार्यक्रमाचे आयोजन श्री. संदीप हाके, अधीक्षक अभियंता (स्थापत्य), कोल्हापूर मंडळ, श्री. सुनील माने, कार्यकारी अभियंता (स्थापत्य), कोल्हापूर मंडळ व श्री. व्यंकटेश कुलकर्णी, अतिरिक्त कार्यकारी अभियंता (प्रा.प्र.कें. तळंदगे), कोल्हापूर यांनी उत्तम रित्या केले.

## नॉलेज शेअरींग स्कीम रिवार्ड, ईआरपी / आयटी पुरस्कार प्रदान समारंभ




अउदा बांधकाम - नि - संवसु परिमंडळ, वाशी द्वारे अउदा संवसु विभाग डोंबिवली येथील शगुन हॉल, डोंबिवली येथे दि. ०६.०६.२०१६ रोजी महापारेषण कंपनीच्या ११ व्या वर्धापन दिनानिमित्त सन २०१२-१३ व २०१३-१४ करीता राज्यस्तरीय उत्कृष्ट विभाग / उपविभाग/ उपकेंद्र पुरस्कार तसेच नॉलेज शेअरींग स्कीम रिवाड़, ईआरपी/आयटी पुरस्कार प्रदान समारंभ उत्साहात पार पडला.

सांघिक कार्यालयाकडुन दि. ०६.०६.२०१६ रोजी महापारेषण कंपनीच्या वर्धापन दिनाचे दिवशी सन २०१२-१३ व २०१३-१४ करीता राज्यपातळीवरील उत्कृष्ट विभाग/ उपविभाग /उपकेंद्र पुरस्कारप्राप्त तसेच नॉलेज शेअरींग स्कीम रिवार्डमध्ये भाग घेतलेल्या व त्यातुन पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांना तसेच इआरपी/ आयटी मध्ये विशेष योगदान दिलेल्या अधिकारी यांना रोख पारितोषिक आणि मानचिन्ह दि. ०६.०६.२०१६ रोजी प्रदान करण्यात आले. सदर कार्यक्रमाची सुरवात वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता यांचे हस्ते दीप प्रज्वलन करून झाली. या प्रसंगी श्री. मोरेश्वर जांगडे, अधीक्षक अभियंता, चाचणी व संचारण मंडळ, वाशी, श्री. महेंद्र वाळके, अधीक्षक अभियंता, उदादिधा ग्र.कें. संवसु मंडळ, पडघे, श्रीमती जुईली वाघ, अधीक्षक अभियंता, अऊदा संवसु मंडळ, कळवा, श्री. चंद्रकांत भोसले, अधीक्षक अभियंता, चाचणी व संचालन मंडळ, अउदा संवसु मंडळ, पनवेल व श्री. महेश भागवत, अधीक्षक अभियंता (ईआरपी), सांघिक कार्यालय, मुंबई यांनी सर्व कर्मचारी व अधिकारी यांना महापारेषण कंपनीच्या ११ व्या वर्धापन दिना निमित्त शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता तसेच ईआरपी / आयटी चे प्रमुख म्हणुन श्री. संजय शिंदे, मुख्य अभियंता यांच्या हस्ते तसेच अधीक्षक अभियंता, श्री. मोरेश्वर जांगडे, श्री. महेंद्र वाळके, श्रीमती जुईली वाघ, श्री. चंद्रकांत भोसले , श्री. महेश भागवत यांचे हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आली.

श्री. संजय शिंदे, मुख्य अभियंता, वाशी यांनी सर्व पुरस्कार विजेत्याचे अभिनंदन केले व ज्यांना पुरस्कार प्राप्त झाला नाही त्यांनी नव्या उमेदीने प्रयत्न करण्याकरीता त्यांना प्रोत्साहित केले. नॉलेज शेअरींग पुरस्कार ज्यांना मिळाला त्यांचे विशेष कौतुक करून त्यांनी त्यांच्या ज्ञानाचा महापारेषण कंपनीस जास्तीत जास्त उपयोग कसा करून घेता येईल यासाठी प्रयत्न करण्याचा सल्ला दिला. तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याने Techno Savvy व्हावे याकरीता प्रयत्नशील राहिले पाहिजे. यामुळे आपल्या कंपनीच्या प्रगतीचा वाढता आलेख शिखर गाठेल यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे असे त्यांनी नमुद केले व ११ व्या वर्धापण दिना निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती सुरभि महाराज, सहाय्यक अभियंता, चाचणी व संचालन मंडळ, वाशी यांनी केले तर श्री. मोहन नन्नावरे, कार्यकारी अभियंता (स्था), अउदा स्थापत्या बांधकाम नि सुव्यवस्था मंडळ, ऐरोली, यांनी आभार प्रदर्शन केले. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्याकरीता श्री. पी. व्ही. कांबळे, कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, डोंबिवली यांनी तसेच वाशी परिमंडळ येथील सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) डॉ. श्रीमती शितल गेडाम, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, श्री. प्रशांत कुलकर्णी, उपव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सिध्दार्थ जाधव, श्रीमती सुरेखा रोकडे, श्री. सुभाष सोनावणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे जुन / जुलै / ऑगस्ट २०१६

| नियुक्ती- | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | नाव | पद | पद स्थापनेचे ठिकाण | दिनांक |
| १. | श्री. सुगत गमरे | मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) | सांघिक कार्यालय, मुंबई | ०३.०८.२०१६ |
| निवृत्ती- | | | | |
| अ.क्र. | नाव | पद | पद स्थापनेचे ठिकाण | दिनांक |
| १. | श्री. माधव पेन्दोर | मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) | सांघिक कार्यालय, मुंबई | ३०.०६.२०१६ |
| २. | श्री. अशोक लाडे | मुख्य अभियंता (P.A.C.) | सांघिक कार्यालय, मुंबई | ३१.०७.२०१६ |

# MAHATRANSCO PROJECT ON WAMS SMARTGRID, RECEIVES APPRECIATION AT INTERNATIONAL FORUMS.



Amit R. Kulkarni, Additional Executive Engineer-(MAHATRANSCO) explaining MAHATRANSCO SMARTGRID initiatives, to Honourable Shri Piyush Goyal, Minister of State with Independent Charge for Power, Coal, New and Renewable Energy in the Government of India during ISGW-2016.

As a progressive Transmission Utility MAHATRANSCO has undertaken New Technology demonstration project on implementation of Wide Area Measurement Systems (WAMS) and SMARTGRID in MSETCL on pilot basis. The outcome of these projects was shared by Shrikant S. Rajurkar and Amit R. Kulkarni at various prestigious International Forums related to Energy and Power sector development.

MAHATRANSCO experience in implementation of SMARTGRID Technology pilot project demonstration alongwith future aspects in implementation of SMARTGRID project in Indian context was shared at CIGRE- Asia Oceania Regional Council(AORC) Technical Meeting 2016 and International Conference On “Global Trends in the Development of Power T&D System including Smart Grid” during 24-26 February 2016 at New Delhi. It was attended by representatives of Transmission and Distribution Utilities from Asia-Oceania Region, Australia, South Africa, Germany, U.S.A, France and representatives of MNCs in Energy sector apart from Indian Utilities from State, Central and Private sector, Companies in Energy sector. Similarly MAHATRANSCO experience in implementation of Wide Area Measurement Systems (WAMS) was shared at International Conference on Power Systems (ICPS)-2016 organised by IEEE and IIT - Delhi at New Delhi. MAHATRANSCO SMARTGRID experience based paper alongwith issues needing attention in SMARTGRID technology development in Indian scenario written by A.R. Kulkarni, S. S. Rajurkar and M.S.Ballal was presented by Amit R. Kulkarni at the India Smart Grid Week (ISGW-2016), International Conference and Exhibition on Smart Grids and Smart Cities held from 16-18 March 2016 at Manekshaw Center-New Delhi. ISGW-2016 was supported by the Ministries of Power, New & Renewable Energy, Communications & IT, Science & Technology and Ministry of External Affairs. This event was inaugurated by Honourable Shri Piyush Goyal, Minister of State with Independent Charge for Power, Coal, New and Renewable Energy in the Government of India. Honourable Shri Piyush Goyal visited MAHATRANSCO pavilion during this and lauded MAHATRANSCO initiatives, further giving best wishes for MAHATRANSCO future developmental activities in this area. ISGW-2016 was attended by over 1500 Delegates, 203 Speakers and 50 Plus Sponsors and Exhibitors from 33 Countries and provided a great platform for intellectual and social interactions for the participants from all around the world. This International Conference and Exhibition had 203 speakers of which 70 were from 33 Foreign Countries. All these initiatives of MAHATRANSCO at various forums were well appreciated by delegates across the Globe.

These initiatives and related work received encouraging support from Director (Operations)-MAHATRANSCO, Shri O.K.Yempal, Chief Engineer Trans. (O&M), Shri J.D.Weekey throughout the process. Apart from this, Shri Girish Malode from 400kV Lonikand and Shri D.P.Nandanwar from SE (TCC)-Vashi also contributed with required data during some of the works.

## अमरावती परिमंडळात म.रा.वि. पारेषण कंपनीचा ११ वा वर्धापण दिन व राज्यस्तरीय उत्कृष्ट कामगिरी पारितोषिक विजेत्यांचा सत्कार समारंभ उत्साहात साजरा.





म. रा. वि. पा. कं. मर्या. अउदा बांधकाम नि संवसु परिमंडळ अमरावती येथे म.रा.वि पारेक्षण कंपनीचा ११ वर्धापण दिन व सन २०१२-१३ सन २०१३-१४ या वर्षा करीता स्पर्धे ७ मध्ये राज्य स्तरीय पारितोषीक विजेत्यांचा सत्कार समारंभ दि २४.६.२०१६ रोजी साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान श्री. एस जे. पाटील, मुख्य अभियंता, अउदा बांधकाम नि संवसु परिमंडळ अमरावती यांनी भुषवीले व प्रमुख पाहूने म्हणून शासकीय अभियंता, महावितरण कंपनी परिमंडळ, अमरावती हे उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात म. रा. वि. पा. कं मर्या. राज्य स्तरीय उत्कृष्ट कामगिरीसाठी उपकेंद्र उपविभाग विभाग तसेच मंडळ कार्यालय पारितोषिक विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.

राज्यस्तरीय उत्कृष्ट कामगिरी बक्षीस विजेते सन २०१२-१३ करिता

संचलन व सुव्यवस्था.

१. पहिले बक्षीस :- १. चाचणी विभाग, यवतमाळ, २. हॉट लाईन युनिट अकोला, ३. प्रमुख भांडार, बडनेरा.

प्रकल्पा करीता

पहिले बक्षीस :- १. अउदा बांधकाम मंडळ, अमरावती, २.अउदा बांधकाम विभाग, अमरावती

या प्रसंगी विजेत्यांना पुष्पगुच्छ व महापारेक्षण कंपनी तर्फे "शिल्ड" देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास परिमंडळातील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. एस.जे. पाटील, मुख्य अभियंता, अउदा बांधकाम नि संवसु परिमंडळ. अमरावती यांनी पारितोषिक विजेत्यांचे कौतुक केले व अध्यक्षीय भाषणात मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच श्री प्रफुल्ल अवघड, श्री. वंदन मेंढे, श्री. राजेंद्र तिजारे, अधीक्षक अभियंता (पारेषण) व श्री. अविनाश कसबेकर, अधीक्षक अभियंता (स्था) तसेच श्री. नितीन कांबळे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं) यांनी याप्रसंगी विजेत्यांचे कौतुक करून आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन कु. उषा ठुसे, कार्यकारी अभियंता, अउदा बांधकाम मंडळ, अमरावती यांनी केले.

## नाशिक परिमंडळांतर्गत ४६१० वृक्षांचे वृक्षारोपण

दि. १/०७/२०१६ रोजी वनमहोत्सवानिमित्त अति उच्च दाब बांधकाम नि संवसु परिमंडळ नाशिक कार्यालय परिसरात मोठ्या उत्साहात वृक्षारोपण करण्यात आले. दि. ०१ जुलै ते ०७ जुलै २०१६ या कालावधीत नाशिक परिमंडळांतर्गत येणारे मंडळ कार्यालये, विभागीय कार्यालये, उपकेंद्र, वसाहती, यामध्ये अनुक्रमे प्रत्येकी २० रोपे व वसाहतीमध्ये ५० रोपे यांचे वृक्षारोपण करण्यात आले.

त्याप्रमाणे झाडाची लागवड करतांना उदा. पिंपळ, आवळा, चिंच, कडुलिंब, फणस, अशोक, आंबा, जांभुळ, सांग, बांभुळ इत्यादी वृक्षांची लागवड करण्यात आली.

यावेळी श्री. बी.टी. राऊत, मुख्य अभियंता, श्री. गायकवाड, श्री. चुडे, श्री. साळे, सर्व अधीक्षक अभियंते तसेच श्री. पेढ़ेकर, श्री. नवलाखे, श्री. तिरमारे, श्री. पवार, श्रीमती साले, श्री. ढ़ोरे, श्री. लगाटे, सर्व कार्यकारी अभियंते, श्री. सुतार सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं), श्री. तानाजी वाघमारे, सहाय्यक मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, श्री. साळवे उप-कार्यकारी अभियंता तसेच श्री. चिक्षे, श्री. मांजरीकर, श्री. लोहार, व्यवस्थापक (विवले), श्री. दिवसे, कु. रामटेके, श्री. कुलकर्णी, व्यवस्थापक (मा.सं) तसेच श्री. ताजनपुरे, श्री. ताडगे, उप व्यवस्थापक (मा.सं) इतर कर्मचारी वृंद मोठ्याप्रमाणात उपस्थित होते. सर्व कर्मचारी, अधिकारी यांनी या परिमंडळात दिनांक ०१ जुलै २०१६ रोजी या परिमंडाळातील विविध कार्यालये, उपकेंद्रे, वसाहती यात अधिकारी / कर्मचारी यांनी ४,६१० वृक्षांचे वृक्षारोपण केले आहे.

तसेच दिनांक ०२-०७-२०१६ रोजी मा. श्री. ओमप्रकाश एम्पाल, संचालक (संचलन) यांनी परिमंडळास भेट देऊन वृक्षारोपण कार्यक्रमात सहभागी झाले.

या प्रसंगी मुख्य अभियंता, श्री. राऊत यांनी सर्वांना वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल सर्वांना शुभेच्छा दिल्या, तसेच वृक्ष लागवड करण्याबरोबर झाडे जगविण्याबाबत व पर्यावरण पुरक गोष्टीचे जतन करण्याबाबत मार्गदर्शन केले.

## चि. वैभव विजय तोरणे याची M-Tech (N.D.T.) मध्ये सुवर्ण कामगिरी



चि. वैभव तोरणे यांनी National Institute of Technology Tiruchirappali, Tamilnadu येथे M-Tech (N.D.T) अभ्यासक्रमात Gold Medal मिळविले आहे. चि. वैभव तोरणे हा महापारेषण कंपनीच्या अउदा संवसु परिमंडळ, कराड येथे कार्यरत असलेले व्यवस्थापक (मा.सं.) श्री. विजय चंद्रकांत तोरणे, यांचा मुलगा आहे. चि. वैभव विजय तोरणे याने २०१४-२०१६ या वर्षाच्या बॅचमध्ये National Institute of Technology Tiruchirappali, Tamilnadu येथे M- Tech (Non Destructive Testing) मध्ये Highest CGPA-9.65 गुण प्राप्त करून Gold Medal मिळविले आहे. चि. वैभव विजय तोरणे याच्या यशाबद्दल कराड/परिमंडळ कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी श्री. विजय चंद्रकांत तोरणे यांचे सह चि. वैभव विजय तोरणे यांचे अभिनंदन केले व चि. वैभव याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महापारेषण परिवारा तर्फे चि. वैभव याचे अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा.

## श्री.राजकुमार कांबळे, अधीक्षक अभियंता (पारेषण) यांची MMRDA मध्ये प्रतिनियुक्ती वर नियुक्ती



श्री.राजकुमार कांबळे, अधीक्षक अभियंता (पारेषण) यांची MMRDA मध्ये प्रतिनियुक्ती वर नियुक्ती.

MMRDA ही संस्था राज्यभर अनेक मोठ-मोठे प्रकल्प राबवत असते. यासाठी विविध संदर्भात संस्थेतील अधिकारी यांच्या समन्वयाने हाती घेतलेले प्रकल्प पूर्ण करत असते. विद्युत क्षेत्रातील तज्ज्ञ अधिकारी म्हणुन पारेषण बांधणी संदर्भात विशेष ज्ञान असलेले अधिकारी यांची प्रतिनियुक्तीवर आपल्या कंपनीकडे MMRDA कडुन मागणी करण्यात आली. याचाच भाग म्हणुन श्री. राजकुमार कांबळे, अधीक्षक अभीयंता (पारेषण), यांची नियुक्ती प्रतिनियुक्तीच्या वर MMRDA मध्ये नियुक्ती करण्यात आली आहे.

श्री. राजकुमार कांबळे हे दिनांक ०२/०८/२०१६ रोजी MMRDA मध्ये प्रतिनियुक्तीवर पदावर रुजु झाले आहे. त्यांच्या MMRDA मधील वाटचाली करीता महापारेषण मधील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्याकडुन अनेका अनेक शुभेच्छा.

## श्रीमती. वर्षा शिंदे, कार्यकारी अभियंता, यांना Knowledge Sharing Scheme अंतर्गत SLDC या प्रवर्गातून द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्रदान



श्रीमती. वर्षा शिंदे, कार्यकारी अभियंता, (महापारेषण) मुंबई यांचा Knowledge Sharing Scheme अंतर्गत SLDC प्रवर्गातून द्वितीय आल्यास्तव त्यांना पारितोषिक वितरीत करण्यात आले.

आपल्या कंपनीने वेतनगट १ व २ मधील अभियंता व अधिकारी वर्गाकडून त्यांच्या कडील असलेल्या विशेष ज्ञानाचा संदर्भ भावी पिढीसाठी उपयोगी ठरेल, तसेच त्यांचे ज्ञान इतर अधिकारी वर्ग हे संदर्भ म्हणुन वापर करतील याकरीता "Knowledge Showing Scheme" आपल्या कंपनीमध्ये राबवण्यात आली.

ह्या योजने अंतर्गत श्रीमती वर्षा शिंदे, कार्यकारी अभियंता (महापारेषण) सांघिक कार्यालय, मुंबई यांना SLDC प्रवर्गातून द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले.

त्यांच्या पारितोषिकाचे वितरण दि. ०८.०६.२०१६ रोजी श्री. अशोक लाडे, मुख्य अभियंता (मा.सं.वि) यांच्या हस्ते सां.का., मुंबई येथे झाले. ह्या कार्यक्रमास श्री. सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मा.सं.अ.तां), श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं.तां), श्री. शशिकांत बाकरे, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) व इतर मानव संसाधन व तांत्रिक विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## कुमारी त्रिशा हिची उच्च माध्यमिक शांलात परिक्षेत उत्तुंग भरारी



कुमारी त्रिशा अमृत बोरीचा हिने फेब्रुवारी २०१६ च्या उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत इ.१२वी मध्ये वाणिज्य विषयात सुयश संपादन केले.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, सांघिक कार्यालय, प्रकाशगंगा, मुंबई येथे कार्यरत असणारे श्री. अमृत बोरीचा, मुख्य अभियंता, (प्रकल्प योजना) यांची कन्या कुमारी त्रिशा बोरीचा हिने फेब्रुवारी २०१६ च्या उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत इ.१२वी मध्ये वाणिज्य या विषयातून ७९.०८ टक्के गुण मिळवून सुयश संपादन केले आहे. तिच्या उत्तुंग यशाबद्दल महापारेषण कंपनीतर्फे हार्दिक अभिनंदन आणि तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

## श्री. नागार्जुन अकुला, व्यवस्थापक (विवले), यांचे Chartered Accountants परिक्षेत सुयश



अउदा संवसु परिमंडळ, औरंगाबाद या कार्यालयात कार्यरत असलेले श्री. नागार्जुन अकुला, व्यवस्थापक (विवले) यांनी Chartered Accountants या परिक्षेमध्ये यश संपादन केले.

श्री. नागार्जुन अकुला हे दोन्ही ही पायाने (८७ टक्के) दिव्यांग असून देखील त्यांनी कार्यालयाचे काम उत्तमरित्या सांभाळून त्यांच्या दिव्यांगावर मात करून CA परिक्षा उत्तीर्ण करण्याची कामगिरी केल्याबाबत त्यांचे सर्वस्तरावर कौतुक होत आहे. महापारेषण कंपनी तसेच परिमंडळाकरिता निश्चितच ही बाब भुषनावह आहे.

तसेच श्री. नागार्जुन अकुला यांनी CA व ICWA अशा दोन सर्वोच्च पदव्या संपादीत केलेल्या आहेत. त्यांच्या या यशाबद्दल महापारेषण कंपनीतर्फे मुख्य अभियंता, श्री. जी. टी. मुंडे, अधीक्षक अभियंता, श्री. एस. एन कादरी व सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

महापारेषण परिवारा तर्फे श्री. नागार्जुन अकुला यांचे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा.

## Problem Solving

मानवी प्रवृत्ती भिन्न असल्या कारणास्तव मतांतर तसेच मतभेद होत राहतात. प्रत्येक जण वेगळया वातावरणातून आलेला असतो व त्यामुळे त्यांच्यावर झालेले संस्कार वेगळे राहतात. त्यांच्या वायुमंडळात असलेल्या लोकांचा प्रभाव त्यांच्या मनावर व आचरणावर होत असतो. त्यांनी घेतलेले शिक्षण व मिळालेले अनुभव त्यांची सदविवेकबुध्दी ठरवत असतात.




तसेच सर्वांचे ध्येय /उदिष्ट्ये वेगवेगळी असतात, व ती गाठण्याची मनुष्य प्रयत्न करत असतो. गरजा, आशा, महत्वाकांक्षा, राग, लोभ, इ.त्यास प्रयत्नशील बनवतात. हे ध्येय गाठण्याची ओढ अनेकवेळा मानवाच्या मनात अनेक आव्हाने निर्माण करतात. त्यावर मात करण्याच्या प्रयत्नात अनेक अडचणी, समस्या तसेच काही अपवादात्मक चुका त्याच्या हातातून घडू शकतात.

ह्या समस्या व्यवस्थितपणे हाताळण्याची गरज असते, नाही तर त्या आटोक्याच्या बाहेर जावू शकतात. त्याकरिता समस्या निर्माण झाल्यास घाबरुन न जाता त्यावर अनेक विकल्पांचा अभ्यास करणे गरजेचे राहते. असलेल्या विकल्पातुन जो सर्वात चांगला विकल्प आहे तो अंमलात आणने गरजेचे राहते. जर एकही विकल्प उपयुक्त ठरत नसेल तर त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधणे गरजेचे राहते.

कोणताही निर्णय घेतांना शांत बुध्दीने आपल्या सदविवेक बुध्दीने घेणे गरजेचे राहते. त्यातुनच आपली खरी कसोटी लागते. आजच्या स्पर्धात्मक युगात संसाधनाची साधने कमी व ध्येये / उदिष्ट्ये अनेक असतात. करीता आपल्याला उचित विकल्प निवडणे फार महत्त्वाचे असते . विकल्प निवडीमध्ये चूक झाल्यास अपयश पत्कारावे लागेल व त्यातून नैराश्य येऊ शकते.

करीता समस्यांचा चांगल्या मनाने आणि विचाराने सामना करा.

**From the Desk of ED (HR)**

## IIM अहमदाबाद व पॉवरग्रिड पाचगांव येथे वेतनगट १ मधील अधिकारी यांचे तीन दिवशीय प्रशिक्षण शिबिर संपन्न




भारतीय प्रबंधक संस्थान (IIM), अहमदाबाद (गुजरात) येथील प्रशिक्षणार्थी अधिकारी



पॉवरग्रिड, पाचगांव (मानेसर), हरियाणा येथील प्रशिक्षणार्थी अधिकारी

भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाने जाहीर केलेल्या राष्ट्रीय प्रशिक्षण धोरणानुसार, महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रतिवर्षी किमान ७ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येते. या अनुषंगाने, तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील वेतनगट १ साठी, भारतीय प्रबंधक संस्थान (IIM), अहमदाबाद (गुजरात) येथे साल २०१६-१७ करिता ३२३ अधिकाऱ्यांना एकुण ७ बॅचेसमध्ये 'लीडरशीप व चेंज मॅनेजमेंट' या विषयावर ३ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

तसेच तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील वेतनगट १ व २ साठी महापारेषण व पॉवरग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, गुरूग्राम (हरियाणा) येथे साल २०१६-१७ १०८० अधिकाऱ्यांना एकुण २७ बॅचेसमध्ये 'मध्यम पातळीवरील अधिकाऱ्यांसाठी प्रबंधन' या विषयावर ३ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

या दोन्ही प्रशिक्षणांचे उद्घाटन दि. २७ जून रोजी करण्यात आले व प्रथम तुकडीचे प्रशिक्षण संपन्न झाले. या प्रसंगी, श्री. शशिकांत बाकरे, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण), महापारेषण, सांघिक कार्यालय, मुंबई हे पॉवरग्रिडच्या पाचगांव (मानेसर) हरियाणा येथील प्रशिक्षण केंद्रात उपस्थीत होते.

या प्रशिक्षणांनंतर अधिकाऱ्यांचे प्रतिसाद उपलब्ध झाले असुन, दैनंदिन कार्यालयीन कामांमधील अडथळे पार करण्यासाठी या प्रशिक्षणांमधून झालेल्या कौशल्य विकासाचा चांगला उपयोग होत असल्याचे अधिकाऱ्यांनी आवर्जुन सांगितले.

संपादक : श्री.संदीप नरडेले, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO For Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,
Printed at Hema Arts : 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.